# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 08 August 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०८ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभेत आज मांडलेलं वक्फ विधेयक युक्त संसदीय समितीकडे सादर
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे दोन हप्ते १७ ऑगस्टला जमा होणार
- यवतमाळचे डॉ विवेक पोलशेट्टीवार यांना मानाचा शांतीस्वरूप भटनागर पुरस्कार जाहीर

आणि

- पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत नीरज चोप्रा आज अंतिम फेरीत खेळणार तर हॉकीमध्ये भारतीय पुरुष संघाचा कांस्य पदकासाठी स्पेन सोबत सामना

****

लोकसभेत आज मांडलेलं वक्फ विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी हे विधेयक सदनासमोर मांडताना, या विधेयकात दडवण्यासारखं काही नसल्याचं सांगत, सरकार या प्रस्तावित कायद्याची पूर्ण पडताळणी करण्यास तयार असल्याचं नमूद केलं. मुस्लीम समाजातील वंचित आणि गरीब वर्गाच्या नागरिकांना न्याय मिळवून देणं, हाच या विधेयकाचा उद्देश असल्याचं रिजीजू यांनी सांगितलं. वक्फ बोर्डाशी संबंधित जवळपास १२ हजार प्रकरणं प्रलंबित असून, गेल्या वर्षभरातच अतिक्रमणाबाबत दोनशेहून अधिक तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती रिजीजू यांनी दिली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी, आदी विरोधी पक्षांनी या विधेयकाला विरोध दर्शवत, महाराष्ट्र तसंच हरियाणातल्या आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे विधेयक आणल्याचा आरोप केला.

संयुक्त जनता दलाचे राजीव रंजन उर्फ लल्लनसिंह यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावत, वक्फ मंडळ ही कायद्याने स्थापन केलेली एक संस्था असून, तिचा कारभार पारदर्शक करण्यासाठी हे विधेयक सरकारने सादर केल्याचं सांगितलं. तेलगू देशम पक्षाचे जी एम हरीश बालयोगी यांनीही सदर संस्थेचं कामकाज अधिक पारदर्शक व्हावं, यासाठी हा कायदा करणं आवश्यक असल्याचं सांगितलं.

****

जल जीवन मिशन अंतर्गत देशभरातील ७७ टक्क्यांहून अधिक म्हणजे सुमारे १५ कोटी ग्रामीण कुटुंबांना नळ जोडणी देण्यात आली आहे. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात ही माहिती दिली.

****

दरम्यान, शेतमालाला हमीभाव देण्यासाठी कायदेशीर तरतुदीची मागणी करत, विरोधी पक्षांच्या खासदारांनी आज संसद परिसरात निदर्शनं केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओ–ब्रायन, राष्ट्रीय जनता दलाचे खासदार मनोज कुमार झा, काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

****

चंद्रयान तीन यशस्वी मोहिमेच्या स्मरणार्थ केंद्र सरकारतर्फे २३ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून साजरा केला जाणार आहे. याच्या पूर्वतयारीचा भाग असलेल्या 'टचिंग द मून व्हाईल टचिंग द लाईव्हस – इंडियाज् स्पेस सागा' या एक दिवसीय कार्यशाळेचं आज नागपूर इथं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था –व्ही एन आय टी संस्थेद्वारे आयोजित या कार्यशाळेचं उद्घाटन चांद्रयान तीन चे प्रकल्प संचालक डॉ. पी. वीरमुथुवेल यांच्या हस्ते झालं. दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेमध्ये चांद्रयान मिशन, अंतराळ तंत्रज्ञानाचे सामाजिक परिणाम या विषयावर चर्चासत्र तसंच विद्यार्थ्यांचा अंतराळ वैज्ञानिकांसोबत संवाद आदी कार्यक्रम होणार आहेत.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे जुलै आणि ऑगस्ट महिन्याच्या दोन्ही हप्त्याची रक्कम १७ ऑगस्ट रोजी महिलांच्या खात्यात जमा केली जाणार आहे. पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात हे पैसे जमा होतील, अशी घोषणा

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेला आजपासून सुरुवात होत आहे. त्या निमित्तानं नाशिक जिल्ह्यात दिंडोरी इथं, जाहीर सभेत ते बोलत होते. या वर्षीच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी, तरुणांसाठी, शेतकऱ्यांसाठी अनेक चांगल्या योजना सरकारने आणल्या असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं

****

शेतकऱ्यांना कृषी पूरक साहित्याचं तातडीनं वितरण करण्याचे निर्देश कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत. कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात आयोजित बैठकीत ते काल बोलत होते. राज्यात ९९ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत त्यामुळे शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून डीबीटी पोर्टलवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना दिली जाणारी कृषी पूरक उपकरणं, निविष्ठा यांचं वितरण त्वरित करावं असंही ते म्हणाले. यावेळी विविध योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींच्या संदर्भात आढावा घेण्यात आला.

****

मुख्यमंत्री कृषी आणि अन्न प्रक्रिया योजना राबवण्यासाठी २४ कोटी ७४ लाख ८२ हजार रुपये एवढा निधी कृषी आयुक्त यांना वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे.

****

संशोधन क्षेत्रातल्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारासाठी यवतमाळच्या मुकूटबन इथले डॉ विवेक पोलशेट्टीवार यांची निवड झाली आहे. त्यांना रसायनशास्त्राचा शांती स्वरूप भटनागर पुरस्कार जाहीर झाला आहे. २३ ऑगस्टला दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पोलशेट्टीवार हे सध्या टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. पोलशेट्टीवार यांनी हवेतील कार्बनचे घटक वेगळे करून त्याचं उपयोगी घटकात रुपांतर करण्याबाबत संशोधन केलं आहे. प्रदुषण मुक्तीच्या दिशेनं टाकलेले हे महत्त्वाचं पाऊल मानल जातं.

****

पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांचं आज कोलकाता इथं निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. २००० ते २०११ असे तब्बल ११ वर्ष त्यांनी पश्चिम बंगालचं मुख्यमंत्रिपद भूषवलं होतं.

****

भारतीय रिझर्व बँकेनं आज चालू आर्थिक वर्षातलं तिसरं द्वैमासिक पतधोरण जाहीर केलं. सलग नवव्यांदा रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय बँकेनं घेतला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी ही माहिती दिली. आर्थिक विकासाला चालना देताना चलनवाढ निर्धारित उद्दिष्टाशी सुसंगत राहील, यावर लक्ष केंद्रीत करण्यावर पतधोरण समितीनं भर दिल्याचं त्यांनी सांगितलं.

****

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत आज भालाफेकपटू नीरज चोप्रा सुवर्ण पदकासाठी खेळणार आहे. रात्री १२ वाजता या स्पर्धेला सुरुवात होईल. हॉकीमध्ये भारतीय पुरुष संघाचा आज कांस्य पदकासाठीचा सामना स्पेन सोबत होणार आहे. कुस्तीमध्ये पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात अमन सहरावत याने उपांत्यफेरीत धडक मारली आहे. उपांत्यपूर्व फेरीत त्याने अल्बानियाच्या झेलिमखान अबकारोवचा १२-० असा पराभव केला. हा सामना आज रात्री पावणे दहा वाजता होणार आहे.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत मराठवाड्यात आतापर्यंत २६ लाख २४ हजार ४६१ अर्ज प्राप्त झालेले आहेत त्यापैकी २४ लाख ३९५ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. एकूण पात्र लाभार्थी महिलांचं प्रमाण ९४ टक्के असल्याचं पावडे यांनी सांगितलं.

****

१३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत राबवल्या जात असलेल्या हर घर तिरंगा अभियानात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावं, असं आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी या अभियानाच्या नियोजनाचा आढावा घेतला. सर्व तालुके आणि गावांमध्ये हे अभियान विविध उपक्रम, नाविन्यपूर्ण संकल्पनासह राबवावं, त्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी राष्ट्र ध्वजाची मुबलक प्रमाणात उपलब्धता ठेवावी. राष्ट्रध्वजाचा सन्मान ठेवला जाईल, याची खबरदारी सर्वांनी घ्यावी, आदी सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. या अभियानात तिरंगा रॅली, तिरंगा यात्रा, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा कॉन्सर्ट, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा

प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, तिरंगा ट्रीब्यूट असे विविध उपक्रम उद्यापासून राबवण्यात येणार आहेत.

बीड जिल्ह्यातही उद्या सकाळी साडेदहा वाजता तिरंगा रॅलीला सुरुवात होणार आहे. नागरिकांनी या रॅलीत सहभाग नोंदवण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

****

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती आणि नवबौध्द समाजातील नवउद्योजकांसाठी मार्जिन मनी योजना सुरू करण्यात आलेली आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी लातूरच्या समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावेत असं आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांनी केलं आहे.

****

बांग्लादेशमध्ये उफाळलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर तिथे अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असं आवाहन हिंगोलीचे जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी केलं आहे. महाराष्ट्रातून बांग्लादेशमध्ये व्यापार, शिक्षण आदी कारणाने गेलेल्या नागरिकांसाठी त्यांनी हे आवाहन केलं आहे.

****

बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेमुळे महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांनी कांदा निर्यात तात्पुरती थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. परिस्थिती स्थिर झाल्यानंतरच निर्यात पुन्हा सुरू होईल. बांगलादेशमध्ये महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, नाशिक, सोलापूर आणि पुणे इथून सर्वाधिक कांदा निर्यात होते. परंतू राजकीय अस्थिरतेमुळे कांदा व्यापारी सावध भूमिका घेत असून परिस्थिती सुधारल्यानंतरच निर्यातीचा निर्णय घेतला जाईल, असे फलोत्पादन निर्यातदार संघटनेने स्पष्ट केले आहे.

****